मराठी साप्ताहिक

# युवाशक्ती एक्सप्रेस

RNI No. MAHMAR/2016/72543

युवाशक्ती मिडिया,प्रेस अँड फिल्म वर्कर्स युनियन (रजि.) YUVASHAKTI MEDIA,PRESS AND FILM WORKERS UNION

वर्ष ७वे | अंक :५२ | रविवार दि . २९ मार्च ते शनिवार ०४ एप्रिल २०२६ | किंमत रू. १/- | पृष्ठ : ४

पान २ — संपादकीय — वाढता उष्मा आणि किडनीचे आरोग्य

पान ३ — वसई-विरार पालिकेच्या कंत्राटी...

पान ४ — वसईत 'पेट्रोल पंप' की लूटमारीचा अड्डा?

## राजावली-मधुबन परिसरात अनधिकृत बांधकामांचा 'महापूर'; पालिकेचे अधिकारी संशयाच्या भोव-यात

### मीठागरे, कृषी जमिनींवर भूमाफियांचे आक्रमण;

### महापौरांकडून कारवाईचे आदेश, पण अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह



प्रतिनिधी, वसई - वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'जी' अंतर्गत येणाऱ्या राजावली-मधुबन परिसरात अनधिकृत बांधकामांनी सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत. या भागात सध्या अनधिकृत चाळींचा अक्षरशः महापूर आला असून, यामागे पालिका प्रशासनातील अधिकारी आणि भूमाफियांचे मोठे 'साटंलोटं' असल्याचा खळबळजनक आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत महापौर अजय पाटील यांनी तातडीने सर्वेक्षण करून कारवाईचे आदेश दिले असले, तरी पालिकेची आजवरची कार्यपद्धती पाहता ही कारवाई केवळ कागदावरच राहणार की काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे. नियोजनाचा बोजवारा राजावली-मधुबन परिसरात गेल्या काही महिन्यांपासून अनधिकृत बांधकामांनी वेग घेतला आहे. विशेष म्हणजे, ही बांधकामे करताना विकास आराखड्याचे (DP) सर्व नियम धाब्यावर बसवण्यात आले आहेत. निशाण्यावर 'सॉल्ट प्लॉट्स': केवळ मोकळ्या भूखंडांवरच नव्हे, तर चक्क प्रतिबंधित मीठागरे आणि सुपीक कृषी जमिनींवरही भूमाफियांनी अतिक्रमण केले आहे. रात्रीचा 'खेळ': पालिकेच्या कारवाईपासून

पान नं.२वर

## वसई-विरार महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागात गंभीर अनियमिततेचे आरोप; कार्यपद्धती, समता व पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह




वसई-विरार : वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागातील कार्यपद्धतीबाबत गंभीर स्वरूपाचे प्रश्न उपस्थित झाले असून, आरोग्य निरीक्षकांच्या कर्तव्य पार पाडण्यात विसंगती, संभाव्य पक्षपातीपणा आणि प्रशासनातील समतेच्या तत्त्वाला बाधा निर्माण होण्याचे आरोप प्रशासनास समोर आले आहेत.घनकचरा व्यवस्थापन विभागातील 'आरोग्य निरीक्षक' हे पद मूलतः क्षेत्रीय (Field) कामाशी थेट संबंधित आहे. दैनंदिन कचरा संकलनाची प्रत्यक्ष पाहणी करणे, घनकचरा सफाई कामगार, मुकादम तसेच नियुक्त ठेकेदार यांच्याकडून काम नियमानुसार, नियमित व समाधानकारकरीत्या पार पडत आहे की नाही यावर देखरेख ठेवणे, तसेच प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेऊन त्याबाबत अहवाल सादर करणे ही या पदाची अत्यावश्यक जबाबदारी आहे.याशिवाय, संबंधित घनकचरा ठेकेदारांच्या देयकांची (बिल) मंजुरी प्रक्रिया ही मोठ्या प्रमाणात आरोग्य निरीक्षकांनी सादर केलेल्या अहवालांवर आधारित असते. त्यामुळे या पदावरील अधिकाऱ्यांची क्षेत्रीय उपस्थिती ही केवळ अपेक्षित नसून अत्यावश्यक मानली जाते. अशा परिस्थितीत क्षेत्रीय कामकाजाकडे दुर्लक्ष होणे किंवा त्यामध्ये असमतोल निर्माण होणे ही बाब प्रशासनाच्या दृष्टीने अत्यंत गंभीर आहे. तक्रारीनुसार, विभागातील एक महिला आरोग्य निरीक्षक अनेक वर्षांपासून मुख्यालयातच कार्यरत असून त्या क्षेत्रीय जबाबदाऱ्यांपासून दूर असल्याचे निदर्शनास आले आहे. परिणामी, त्यांच्या नेमक्या कार्याच्या स्वरूपाबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, संबंधित नियुक्ती व कार्यविभाजन प्रक्रियेची पारदर्शकता संशयास्पद असल्याची भावना व्यक्त होत आहे.यासोबतच, घनकचरा व्यवस्थापन विभागात एकूण ४८ आरोग्य निरीक्षक कार्यरत असून त्यापैकी ०६ महिला आरोग्य

पान नं.२वर

## वसईत माहिती अधिकाराचा उघड बोजवारा :

### ३१ ग्रामपंचायतींमध्ये मनमानी, आदेश धाब्यावर; अपिलीय यंत्रणाही ठप्प




वसई तालुक्यात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अक्षरशः धाब्यावर बसवण्यात आल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. तब्बल ३१ ग्रामपंचायतींमध्ये माहिती न देणे, आदेशांची जाणीवपूर्वक अवहेलना करणे आणि अपिलीय प्रक्रियेलाही विलंब लावणे असे प्रकार सातत्याने घडत असल्याने प्रशासनाच्या पारदर्शकतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नागरिकांच्या कायदेशीर हक्कांची सर्रास पायमल्ली होत असल्याचा गंभीर आरोप पुढे येत आहे. कळंब, टोकरे, टिवरी, तिल्हेर, टेमभी, तरखड, शिवणसई, सायवन, सत्पाल , पारोळ, पाणजू, मेढे, माजिवली, खोचिवडे , खानिवडे, वासलई, भाताने, रानगाव, पोमण, अर्नाळा, मालजीपाडा, चंद्रपाडा व करंजोण या २३ ग्रामपंचायतींकडे नोव्हेंबर व डिसेंबर २०२४ मध्ये माहिती अधिकाराखाली माहिती मागविण्यात आली होती. मात्र निर्धारित मुदतीत माहिती न मिळाल्याने दिनांक २६ जानेवारी २०२५ रोजी प्रथम अपील दाखल करण्यात आले. त्यानंतर ११ जुलै २०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली आणि

पान नं.२वर

# संपादकीय...!

## वाढता उष्मा आणि किडनीचे आरोग्य – निसर्ग आणि मानवनिर्मित संकटाचा विळखा

गेल्या काही वर्षांत बदलत्या हवामानाचा आणि जागतिक तापमानवाढीचा (Global Warming) फटका केवळ पर्यावरणालाच नव्हे, तर मानवी आरोग्यालाही बसू लागला आहे. विशेषतः उन्हाळ्यातील वाढत्या पाऱ्यामुळे 'किडनी' (मूत्रपिंड) निकामी होण्याच्या घटनांमध्ये झालेली वाढ ही धोक्याची घंटा आहे. डिहायड्रेशन, उष्णतेची लाट आणि प्रदूषित पाणी या त्रिसूत्रीने सर्वसामान्यांचे आरोग्य पणाला लागले आहे. उष्माः एक अदृश्य शत्रू

उन्हाळ्यात शेतात काम करणे किंवा कामानिमित्त प्रवास करणे अनेकांसाठी अपरिहार्य असते. मात्र, जळगावसारख्या उष्ण भागातील पत्र्याच्या शेडमध्ये काम करणाऱ्या विकासची असो किंवा गावी जत्रेला गेलेल्या निवृत्त पोस्टमास्तर धनावडे यांची केस असो; या सर्वांमध्ये एक समान धागा आहे—'हीट रिलेटेड इलनेस'. शरीरातील पाण्याचे प्रमाण अचानक कमी झाल्यामुळे (Dehydration) किडनीवर येणारा ताण हा जीवघेणा ठरू शकतो. विशेषतः ज्यांचे किडनी प्रत्यारोपण झाले आहे किंवा जे आधीच मधुमेहासारख्या आजाराने ग्रस्त आहेत, त्यांच्यासाठी हा उष्मा अधिक घातक ठरत आहे.मेजोअमेरिकन नेफ्रोपॅथी आणि भारतीय वास्तव

मध्य अमेरिकेतील देशांमध्ये उसाच्या शेतात काम करणाऱ्या मजुरांमध्ये आढळणारा 'मेजोअमेरिकन नेफ्रोपॅथी' हा आजार आता आपल्या उंबरठ्यावर येऊन ठेपला आहे. उत्तर महाराष्ट्रातील शेतमजुरांमध्येही अशाच प्रकारची लक्षणे दिसू लागली आहेत. कामाच्या ठिकाणी विश्रांतीचा अभाव आणि शुद्ध पिण्याच्या पाण्याची अनुपलब्धता यामुळे किडनीचे विकार बळावत आहेत. हे केवळ आरोग्य संकट नसून ते एक सामाजिक आणि आर्थिक संकटही आहे, कारण याचा सर्वाधिक फटका कष्टकरी आणि गरीब वर्गाला बसत आहे.मानवनिर्मित संकटांची भर केवळ निसर्गच आपल्याला छळतोय असे नाही, तर मानवनिर्मित चुकाही किडनी निकामी करण्यास कारणीभूत ठरत आहेत.भेसळयुक्त औषधेः कफ सिरपमधील भेसळीमुळे लहान मुलांच्या किडनी फेल होण्याच्या घटना मन सुन्न करणाऱ्या आहेत. प्रदूषित अन्न व पाणीः भेसळयुक्त दूध आणि मैलामिश्रित पाणी यामुळे होणारे मृत्यू हे आपण 'विकास' नक्की कोणत्या दिशेने करत आहोत, यावर प्रश्नचिन्ह उभे करतात.सौंदर्य प्रसाधनेः फेअरनेस क्रीममधील पारा (Mercury) यांसारखे घटकही किडनीसाठी तितकेच घातक ठरत आहेत.विकासाची खरी व्याख्या काय?आज आपण डिजिटल क्रांती आणि पायाभूत सुविधांच्या गप्पा मारतो, परंतु एका रुग्णाने विचारलेला प्रश्न अंतर्मुख करणारा आहे—'बाहेर शुद्ध पाणी मिळत नाही, म्हणून पाणी पिणे टाळतो.' ज्या देशात सामान्य नागरिक नळाला येणारे पाणी फिल्टरशिवाय बिनधास्त पिऊ शकतो, तोच खरा विकसित देश. दुर्दैवाने, शुद्ध हवा, स्वच्छ पाणी आणि सुरक्षित अन्न या मूलभूत गरजांसाठीही आजही संघर्ष करावा लागत आहे.सावधानता हाच उपाय वाढत्या उष्म्यापासून वाचण्यासाठी काही पथ्ये पाळणे आता अनिवार्य झाले आहेः भरपूर पाणी प्याः तहान नसली तरी पाणी पिण्याची सवय लावा. संरक्षणः घराबाहेर पडताना छत्री, टोपी आणि सुती कपड्यांचा वापर करा.वेळेचे नियोजनः दुपारी १२ ते ४ या वेळेत कडक उन्हात काम करणे टाळा.वैद्यकीय सल्लाः थकवा, लघवीचे प्रमाण कमी होणे किंवा चक्कर येणे यांसारखी लक्षणे दिसल्यास त्वरित डॉक्टरांशी संपर्क साधा. हवामान बदल ही आता केवळ पुस्तकी चर्चा राहिलेली नाही, ती आपल्या घरापर्यंत पोहोचली आहे. पर्यावरणाचे रक्षण आणि सार्वजनिक आरोग्य व्यवस्था बळकट करणे ही काळाची गरज आहे. अन्यथा, निसर्गाचा कोप आणि मानवी निष्काळजीपणा आपल्या पिढीला आरोग्याच्या मोठ्या संकटात ढकलल्याशिवाय राहणार नाही.

## ओळख पटविण्याचे आवाहन ...पान न. ३ वरून'

मृत घोषित केले. मृत्यूचे कारणः वैद्यकीय अहवालानुसार मृत्यू नैसर्गिक (Liver Cirrhosis) आहे.

मृत व्यक्तीचे वर्णनः वयः अंदाजे ४० ते ४५ वर्षे.लिंगः पुरुष. सदर मृत व्यक्तीबाबत काही माहिती असल्यास किंवा कोणी नातेवाईक असल्यास त्यांनी तातडीने खालील क्रमांकावर संपर्क साधावाः वालीव पोलीस ठाणेः ८६६९६०४०१७ तपासी अधिकारीः ९८५०१७६५०१

- वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वालीव पोलीस ठाणे

## राजावली-मधुबन परिसरात अनधिकृत बांधकामांचा ...पान न. १ वरून'

वाचण्यासाठी रात्रीच्या अंधारात किंवा शनिवार-रविवारच्या सुट्ट्यांचे निमित्त साधून ही बांधकामे पूर्ण केली जात असल्याचे समोर आले आहे.

अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह- या बेकायदा बांधकामांना प्रभाग समिती 'जी' चे साहाय्यक आयुक्त निलेश म्हात्रे आणि कनिष्ठ अभियंता मनोज घरत यांचे मूक संमती असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. अनेकदा तक्रारी करूनही या अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याने, भ्रष्टाचाराचे आरोप आता जोर धरू लागले आहेत. 'प्रशासनाच्या आशीर्वादाशिवाय इतक्या मोठ्या प्रमाणावर चाळी उभारणे अशक्य आहे,' अशी भावना संतप्त रहिवाशांनी व्यक्त केली आहे.

पायाभूत सुविधांवर ताण- अनधिकृत बांधकामांच्या वाढत्या संख्येमुळे परिसरातील पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन आणि वीजपुरवठा यांसारख्या मूलभूत सुविधांवर प्रचंड ताण येत आहे. निकृष्ट दर्जाच्या बांधकामामुळे भविष्यात मोठी दुर्घटना घडल्यास त्याला जबाबदार कोण, असा सवालही उपस्थित केला जात आहे.

महापौरांचा 'अल्टिमेटम'- वाढता रोष पाहता महापौर अजय पाटील यांनी या प्रकरणाची दखल घेत संबंधित विभागाला तात्काळ सर्वेक्षण करून कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. या मोहिमेत दोषी आढळणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचे संकेतही दिले आहेत. मात्र, प्रशासकीय यंत्रणा प्रत्यक्षात बुलडोझर चालवणार की पुन्हा एकदा 'आदेशा'च्या नावाखाली वेळकाढूपणा करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

नागरिकांच्या मागण्याः- संपूर्ण परिसराचे ड्रोनद्वारे तातडीने सर्वेक्षण करावे. संगनमत करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांचे निलंबन व्हावे. बांधकाम माफियांवर मोक्का किंवा तत्सम कठोर कायदेशीर कारवाई करावी.

## वसई-विरार महानगरपालिकेच्या ...पान न. १ वरून'

निरीक्षक आहेत. असे असताना, केवळ एका महिला आरोग्य निरीक्षकास मुख्यालयातच दीर्घकाळ कार्यरत ठेवण्यात येत आहे. उर्वरित ०५ महिला आरोग्य निरीक्षक नियमितपणे क्षेत्रीय कामकाज पार पाडत आहेत. या पार्श्वभूमीवर, एकाच अधिकाऱ्याला मुख्यालयात ठेवण्यामागील कारणमीमांसा काय, याबाबत प्रशासनाने स्पष्टीकरण देणे आवश्यक असल्याची मागणी करण्यात येत आहे.विशेष म्हणजे, इतर महिला आरोग्य निरीक्षक नियमितपणे क्षेत्रीय कामकाज पार पाडत असताना, केवळ एका महिला आरोग्य निरीक्षकाला मुख्यालयात ठेवणे पक्षपाती, अन्यायकारक व प्रशासनातील समानता तत्त्वाला बाधक ठरत असल्याचे स्पष्ट होते.या परिस्थितीमुळे घनकचरा व्यवस्थापनाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. क्षेत्रीय देखरेखीचा अभाव राहिल्यास कचरा संकलन प्रक्रियेच्या गुणवत्तेवर परिणाम होऊ शकतो तसेच ठेकेदारांच्या कामकाजावर प्रभावी नियंत्रण राहणार नाही. परिणामी, देयक मंजुरी प्रक्रियेतही अनियमितता होण्याची शक्यता वर्धित होते.ही बाब केवळ प्रशासकीय पातळीपुरती मर्यादित नसून थेट नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित असल्याने सार्वजनिक हिताच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. त्यामुळे या प्रकरणाची सखोल, निष्पक्ष व उच्चस्तरीय चौकशी करून वस्तुस्थिती समोर आणावी, अशी मागणी करण्यात आली आहे.तसेच, सर्व आरोग्य निरीक्षकांना समान निकषांवर क्षेत्रीय जबाबदाऱ्या देऊन कार्यपद्धतीत पारदर्शकता, समता व उत्तरदायित्व सुनिश्चित करावे, तसेच भविष्यात अशा प्रकारच्या विसंगती टाळण्यासाठी ठोस मार्गदर्शक तत्त्वे व नियंत्रण यंत्रणा राबवावी, अशीही मागणी पुढे आली आहे.

दरम्यान, या गंभीर आरोपांवर महानगरपालिका प्रशासन कोणती भूमिका घेते, तसेच चौकशी करून संबंधितांवर कोणती कारवाई केली जाते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## वसईत माहिती अधिकाराचा उघड बोजवारा ...पान न. १ वरून'

०६ ऑगस्ट २०२५ रोजी प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी स्पष्ट आदेश दिला की तक्रारदारास संबंधित नोंदींचे निरीक्षण देऊन मागितलेली माहिती विनामूल्य प्रदान करण्यात यावी. हा आदेश बाध्यकारी आणि तात्काळ अंमलबजावणीस पात्र असतानाही आजपर्यंत या ग्रामपंचायतींकडून ना माहिती देण्यात आली, ना निरीक्षण देण्यात आले. यावरून शासकीय नोंदी दडपणे, पुरावे उपलब्ध होऊ न देणे आणि भ्रष्ट हेतूने माहिती रोखण्याचा पूर्वनियोजित प्रयत्न असल्याचे स्पष्ट दिसून येते.या प्रकरणात अर्जदाराने संबंधित २३ ग्रामपंचायतींविरुद्ध दुसरे अपील देखील दाखल केले आहे. मात्र प्रशासनाचा ढिलेपणा इतका आहे की ही दुसरी अपिले प्रत्यक्ष सुनावणीसाठी तब्बल २ ते ३ वर्षांनी लागतात. हाच विलंब हा संपूर्ण गैरप्रकार फोफावण्यामागील मुख्य कारण ठरत असून माहिती अधिकाराची अंमलबजावणी प्रत्यक्षात कोलमडली असल्याचे चित्र दिसत आहे.दुसरीकडे, आडणे, अर्नाळा किल्ला, खर्डी, नागले, पाली, सकवार, शिरवली व उसगाव या ८ ग्रामपंचायतींच्या बाबतीत परिस्थिती अधिकच गंभीर आहे. दिनांक २७ जुलै २०२५ रोजी माहिती मागवूनही मुदतीत माहिती देण्यात आली नाही. त्यामुळे दिनांक ०५ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रथम अपील दाखल करण्यात आले. मात्र आजपर्यंत त्या अपीलावर साधी सुनावणीसुद्धा निश्चित करण्यात आलेली नाही. यासाठी पंचायत समिती, वसई येथे वारंवार पाठपुरावा करण्यात आला असून १३ डिसेंबर २०२५, ०९ जानेवारी २०२६, ०३ फेब्रुवारी २०२६ आणि २७ फेब्रुवारी २०२६ रोजी एकूण चार स्मरणपत्रे देण्यात आली. प्रत्येक स्मरणपत्रामध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आले होते की अर्जानंतर १० दिवसांच्या आत सुनावणी निश्चित न झाल्यास दुसऱ्या अपीलाचा पर्याय वापरण्यात येईल, तरीसुद्धा प्रशासनाने पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. यावरून केवळ माहिती न देणेच नव्हे तर अपिलीय प्रक्रियेलाही जाणीवपूर्वक अडथळा निर्माण केला जात असल्याचे दिसून येते.या पार्श्वभूमीवर धक्कादायक बाब म्हणजे संबंधित काही माहिती अधिकारी खुलेआम असे सांगत असल्याची तक्रार आहे की, 'आम्ही माहिती अधिकाराला जुमानत नाही; दुसरे अपील २-३ वर्षांनी लागते, तोपर्यंत आमची बदली होते.' या विधानातून अधिकाऱ्यांचा उघड उद्धटपणा आणि कायद्याविषयीचा बेफिकीरीचा दृष्टिकोन समोर येत आहे. हे केवळ वैयक्तिक मनमानी नसून संपूर्ण प्रशासनातील निष्क्रियतेचे जिवंत उदाहरण असल्याचे दिसते.सदर प्रकार हा केवळ प्रशासकीय निष्काळजीपणा नसून गंभीर फौजदारी स्वरूपाचा असल्याचे कायदे जाणकारांचे मत आहे. भारतीय न्याय संहिता (BNS) अंतर्गत कलम ५९, १९९, २३९ आणि २५५ अन्वये ही कृत्ये गुन्हेगारी स्वरूपाची ठरू शकतात. ही सर्व अपराधे संज्ञेय, अजामिनपात्र व गैर-तडजोडीची असल्याने अशा प्रकरणात एफआयआर नोंद करणे कायदेशीर बंधनकारक ठरते. अनेक वेळा तोंडी व लेखी कळवूनही कोणतीही कारवाई झाली नसल्याने हा प्रकार जाणीवपूर्वक माहिती दडपण्याचा गुन्हेगारी हेतू असल्याचे स्पष्ट होत आहे.या संपूर्ण प्रकरणात केवळ ग्रामपंचायत स्तरावरील अधिकारीच नव्हे, तर त्यांच्या वरिष्ठांवरही गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. पालघर जिल्ह्यातील गटविकास अधिकारी (BDO), विस्तार अधिकारी (पंचायत), तसेच पंचायत समिती स्तरावरील प्रथम अपिलीय अधिकारी यांनी वेळेवर कारवाई केली असती, तर ही परिस्थिती उद्भवली नसती. तसेच कोकण आयुक्त कार्यालयाकडे दाखल होणाऱ्या दुसऱ्या अपीलांमध्ये होणारा प्रचंड विलंब हीसुद्धा या गैरप्रकाराला खतपाणी घालणारी बाब ठरत आहे.एकंदरीत, वसई तालुक्यात माहिती अधिकार कायद्याची अंमलबजावणी करणारी यंत्रणा पूर्णपणे निष्क्रिय झाल्याचे चित्र आहे. अधिकाऱ्यांना ना वरिष्ठांचे भय, ना कायद्याची भीती—अशी परिस्थिती निर्माण झाली असून माहिती अधिकार कायद्याला अक्षरशः फाट्यावर मारले जात आहे.आता सर्वांचे लक्ष याकडे लागले आहे की, कोकण आयुक्त, जिल्हा प्रशासन आणि संबंधित वरिष्ठ अधिकारी या गंभीर प्रकरणाची दखल घेऊन दोषींवर कठोर कारवाई करणार का, की माहिती अधिकार कायदा केवळ कागदोपत्रीच राहणार?

# वसई-विरार पालिकेच्या कंत्राटी कर्मचा-यांचा वनवास संपेना!

**न्यायालयाच्या आदेशानंतरही प्रशासकीय दिरंगाई; ३० मार्चच्या महासभेकडे लक्ष**

कोविड-१९ च्या जागतिक संकटात जिवाची पर्वा न करता रुग्णसेवा करणाऱ्या वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांचा कायमस्वरूपी समावेशनाचा प्रश्न प्रशासकीय लालफितीच्या कारभारात अडकला आहे. उच्च न्यायालयाने स्पष्ट निर्देश देऊन दीड वर्षाचा कालावधी उलटला असतानाही, अद्याप कोणताही ठोस निणय न घेतल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. या पार्श्वभूमीवर ३० मार्च रोजी होणाऱ्या महापालिकेच्या विशेष सभेत या कर्मचाऱ्यांच्या भवितव्याचा फैसला होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.महानगरपालिकेतील वैद्यकीय अधिकारी आणि निमवैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या समावेशनाबाबत उच्च न्यायालयात (WP No. ४०७९/२०२१) याचिका दाखल करण्यात आली होती. न्यायालयाने पालिकेला तीन आठवड्यांत राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठवण्याचे आदेश दिले होते. मात्र, प्रशासनाने या आदेशाची प्रभावी अंमलबजावणी न केल्याने कर्मचाऱ्यांनी संताप व्यक्त केला आहे. 'समान काम, समान वेतन' या तत्त्वाची पायमल्ली होत असून, अनुभवी कर्मचाऱ्यांवर आता 'स्पर्धा परीक्षे'ची अट लादणे हा त्यांच्या अनुभवाचा अवमान असल्याचे बोलले जात आहे. राज्य शासनाने चंद्रपूर, मीरा-भाईंदर आणि कोल्हापूर सारख्या महानगरपालिकांमधील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या समावेशनासाठी विशेष धोरण राबवून त्यांना दिलासा दिला आहे. याच धर्तीवर वसई-विरारमध्ये निणय का घेतला जात नाही, असा सवाल ङङ'युवाशक्ती कामगार संघटने'**च्या संस्थापक अध्यक्षा रुबीना मुल्ला यांनी उपस्थित केला आहे. ३० मार्चच्या महासभेत विषय क्रमांक ०८ अंतर्गत अधिसंख्य पदे निर्माण करून या कर्मचाऱ्यांचे कायमस्वरूपी समायोजन करावे, अशी मागणी संघटनेने लावून धरली आहे. अनुभवाचा विचारः वर्षानुवर्षे सेवा देणाऱ्या डॉक्टरांना आणि परिचारिकांना आता पुन्हा लेखी परीक्षेला सामोरे जावे लागणे अन्यायकारक वाटत आहे.अधिसंख्य पदांची निर्मितीः रिक्त पदे आणि वाढत्या शहराची गरज पाहता नवीन पदे निर्माण करणे हाच तांत्रिक मार्ग असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.समितीची गरजः या प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा करण्यासाठी प्रशासन आणि संघटना प्रतिनिधींची समिती नसल्याने समन्वयाचा अभाव दिसून येत आहे.आगामी विशेष महासभेत लोकप्रतिनिधी या संवेदनशील विषयावर प्रशासनाला धारेवर धरतात की कर्मचाऱ्यांच्या पदरात पुन्हा आश्वासनेच पडतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

# वसई-विरार फेरीवाला समिती निवडणूक कायद्याच्या कचाट्यात; उच्च न्यायालयाचा कठोर इशारा



वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या पहिल्या 'नगर पथ विक्रेता समिती' (ऊदैह न्नह्ग्हु ण्दस्स्रूा) निवडणुकीत नियमांची पायमल्ली झाल्याचा आरोप करत, मुंबई उच्च न्यायालयाने या प्रक्रियेवर कडक ताशेरे ओढले आहेत. 'निवडणूक प्रक्रियेत अनियमितता आढळल्यास, संपूर्ण निवडणूक बेकायदेशीर ठरवून आम्ही त्यावर कारवाई करू,' असे स्पष्ट मत मुख्य न्यायमूर्तींनी व्यक्त केले आहे. यामुळे २९ मार्च रोजी होणाऱ्या मतदानानंतरही निवडून येणाऱ्या सदस्यांवर अपात्रतेची टांगती तलवार कायम राहणार आहे. फेरीवाला धोरणाचे नियोजन करण्यासाठी महापालिका क्षेत्रात पथ विक्रेता समिती गठीत केली जाते. वसई-विरारमध्ये पहिल्यांदाच ८ जागांसाठी ही निवडणूक प्रक्रिया राबवली जात आहे. मात्र, या प्रक्रियेत केंद्र शासनाच्या २०१४ आणि राज्य शासनाच्या २०१६ च्या अधिनियमांचे उल्लंघन झाल्याचा दावा करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे विरार शहरप्रमुख उदय जाधव यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे (सिविल रिट पिटीशन ८२४२/२०२६).या याचिकेत उदय जाधव यांनी असा आरोप केला आहे की, नियमानुसार दर ५ वर्षांनी फेरीवाल्यांचे सर्वेक्षण होणे बंधनकारक आहे. मात्र, २०१७ नंतर पालिकेने कोणतेही नवीन सर्वेक्षण केलेले नाही. परिणामी, वसई तालुक्यातील सुमारे २० हजार नवीन मराठी आणि स्थानिक भूमिपुत्र फेरीवाले, ज्यांच्याकडे अधिवास प्रमाणपत्र आहे, त्यांना जाणीवपूर्वक मतदार नोंदणीपासून वंचित ठेवण्यात आले आहे. या तक्रारीकडे पालिकेने दुर्लक्ष केल्यामुळे अखेर न्यायालयाचा दरवाजा ठोठावण्यात आला.बुधवारी, २५ मार्च रोजी मुख्य न्यायमूर्ती श्री. चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती श्याम सुमन यांच्या खंडपीठासमोर यावर सुनावणी झाली. न्यायालयाने निवडणूक स्थगित करण्यास तूर्त नकार दिला असला, तरी प्रक्रियेतील त्रुटींकडे गांभीर्याने लक्ष वेधले. 'निवडणूक झाली तरीही, जर त्यात अनियमितता सिद्ध झाली, तर संपूर्ण निवडणूक प्रक्रिया बेकायदेशीर ठरवण्याचा अधिकार आम्हाला आहे,' असे खंडपीठाने स्पष्ट केले.या प्रकरणात न्यायालयाने राज्य सरकारला आपली बाजू मांडण्याचे आदेश दिले असून, पुढील सुनावणी ७ एप्रिल २०२६ रोजी निश्चित केली आहे. या याचिकेत याचिकाकर्त्यांतर्फे शिव विधी व न्याय सेनेचे ॲड. स्वप्ना प्रमोद कोदे, ॲड. सिद्देसन यादव, ॲड. नितेश सोनावणे, ॲड. मनोज कोंडेकर आणि ॲड. गिरीश दिवाणजी यांनी बाजू मांडली.

> **'स्थानिक मराठी फेरीवाल्यांच्या हक्कासाठी आम्ही ही लढाई लढत आहोत. २० हजार फेरीवाल्यांना मतदानापासून वंचित ठेवून लोकशाही मार्गाने निवडणूक घेण्याचा दावा करणे चुकीचे आहे. न्यायालयाच्या भूमिकेमुळे आम्हाला न्याय मिळेल अशी खात्री आहे.' — उदय जाधव, विरार शहरप्रमुख (शिवसेना उबाठा)**

# साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस ' वृत्तपत्राच्या मालकी आणि इतर तपशिलासंबंधीचे निवेदन

**(वृत्तपत्र नोंदणी कायदा १९५६ च्या मध्यवर्ती नियमावलीनुसार फॉर्म ४ प्रमाणे)**

| | |
|---|---|
| **१) वृत्तपत्राच्या प्रसिद्धीचे ठिकाण :** | रुम न.१० कादरभाई चाळ सर्वोदय वसाहत टाकी रोड तुळींज नालासोपारा पूर्व ता .वसई , जि. पालघर ४०१ २०९, महाराष्ट्र, |
| २) प्रसिद्धीचा कालावधी | : साप्ताहिक |
| ३) मुदकाचे नाव | श्री. तुषार राजरत्न गायकवाड |
| नागरिकत्व | भारतीय |
| पत्ता | रुम न.१० कादरभाई चाळ सर्वोदय वसाहत टाकी रोड तुळींज नालासोपारा पूर्व ता .वसई , जि. पालघर ४०१ २०९, महाराष्ट्र, |
| ४) प्रकाशकाचे नाव | श्री. तुषार राजरत्न गायकवाड |
| नागरिकत्व | भारतीय |
| पत्ता | रुम न.१० कादरभाई चाळ सर्वोदय वसाहत टाकी रोड तुळींज नालासोपारा पूर्व ता .वसई , जि. पालघर ४०१ २०९, महाराष्ट्र, |
| ५) मुख्य संपादकाचे नाव | श्री. तुषार राजरत्न गायकवाड |
| नागरिकत्व | भारतीय |
| पत्ता | रुम न.१० कादरभाई चाळ सर्वोदय वसाहत टाकी रोड तुळींज नालासोपारा पूर्व ता .वसई , जि. पालघर ४०१ २०९, महाराष्ट्र, |
| ६) वृत्तपत्राच्या मालकाचे नावः | श्री. तुषार राजरत्न गायकवाड |
| नागरिकत्व | भारतीय |
| पत्ता | रुम न.१० कादरभाई चाळ सर्वोदय वसाहत टाकी रोड तुळींज नालासोपारा पूर्व ता .वसई , जि. पालघर ४०१ २०९, महाराष्ट्र, |

दिनांक : २२/०३/२०२६

**श्री. तुषार राजरत्न गायकवाड**

# परीक्षेच्या तोंडावर मुख्याध्यापिकेची बदली; संतप्त पालकांनी शाळेला ठोकले टाळे



वसई : तालुक्यातील वाघराळपाडा येथील जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिकेची परीक्षेच्या तोंडावर अचानक बदली करण्यात आल्याने पालकांमध्ये तीव्र संताप उसळला आहे. शासनाच्या या निणयाचा निषेध म्हणून विद्यार्थी आणि पालकांनी गुरुवारी शाळेला टाळे ठोकून ठिय्या आंदोलन केले. ऐन परीक्षेच्या काळात असा 'बदलीचा मेसेज' धाडणे नियमबाह्य असल्याचा आरोप पालकांनी केला असून, मुख्याध्यापिका ज्युली फर्नांडिस यांची बदली रद्द करण्याची मागणी लावून धरली आहे.वाघराळपाडा येथील जिल्हा परिषदेची शाळा पहिली ते पाचवीपर्यंत असून, येथे अवघ्या दोन शिक्षिकांवर शाळेचा पूर्ण भार आहे. असे असतानाही, मुख्याध्यापिका ज्युली फर्नांडिस यांना शासनाकडून अचानक बदलीचा संदेश मोबाईलवर प्राप्त झाला. ही माहिती वाऱ्यासारखी गावात पसरताच पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने शाळेबाहेर जमा झाले.परीक्षेचे नियोजन कोलमडणारः सध्या विद्यार्थ्यांच्या वार्षिक परीक्षा तोंडावर आहेत. अशा वेळी मुख्याध्यापिका बदलल्यास विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर आणि मानसिकतेवर परिणाम होईल, अशी भीती पालकांनी व्यक्त केली आहे.अचानक बदलीवर प्रश्नचिन्हः कोणतीही पूर्वकल्पना न देता, केवळ एका मोबाईल मेसेजद्वारे बदली करणे ही प्रक्रिया कायदेशीर निकषांना धरून नसल्याचा दावा पालकांनी केला आहे.शिक्षक टंचाईः शाळेत आधीच शिक्षकांची संख्या कमी असताना अनुभवी मुख्याध्यापिकेला हटवणे अन्यायकारक असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

# ओळख पटविण्याचे आवाहनः ४५ वर्षीय अनोळखी इसमाचा उपचारादरम्यान मृत्यू



वसई (प्रतिनिधी): वालीव पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका ४५ वर्षीय अनोळखी इसमाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला असून, अद्याप त्याची ओळख पटलेली नाही. २३ नोव्हेंबर २०२५ रोजी श्वास घेण्यास त्रास होत असल्याने या इसमाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय, कांदिवली येथे दाखल करण्यात आले होते. उपचार सुरू असताना २५ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री १०:१० वाजता डॉक्टरांनी त्यांना

पान नं.२वर



# वसईत 'पेट्रोल पंप' की लूटमारीचा अड्डा? पुरवठा अधिका-याला धक्काबुक्की; गुंडगिरी करणा-या पंपावर टाळे ठोकण्याची मागणी

प्रतिनिधी, वसई: वसई तालुक्यात सीएनजी आणि पेट्रोल पंपांवर सर्वसामान्यांची लूट करण्याचे प्रकार आता शिगेला पोहोचले आहेत. नुकत्याच समोर आलेल्या एका खळबळजनक घटनेत, चक्क तहसील कार्यालयातील पुरवठा निरीक्षकानेच या लुटीचा पर्दाफाश केला आहे. मात्र, कारवाईसाठी गेलेल्या या सरकारी अधिकाऱ्यालाच पंपावरील कर्मचाऱ्यांनी घेराव घालून धक्काबुक्की केल्याने खळबळ उडाली आहे. या घटनेनंतर वसईतील 'गुंडगिरी' करणाऱ्या अशा पंपांचे परवाने रद्द करून त्यांना कायमचे सील ठोकण्याची मागणी जोर धरू लागली आहे.वसई तहसील कार्यालयातील पुरवठा अधिकारी भागवत सोनार यांना तक्रार प्राप्त झाली होती की, नालासोपारा पूर्वेकडील 'गुजरात गॅस पेट्रोल पंपावर' रिक्षाचालकांकडून निर्धारित दरापेक्षा जास्त पैसे उकळले जात आहेत. या तक्रारीची शहानिशा करण्यासाठी सोनार यांनी स्वतः रिक्षात बसून 'डिकॉय'



कारवाई केली. यावेळी पंपावरील कर्मचाऱ्यांनी रिक्षाचालकांकडून प्रति गॅस भरणा ३० रुपये अतिरिक्त घेतल्याचे उघड झाले.जेव्हा अधिकारी सोनार यांनी आपली ओळख सांगून जाब विचारला, तेव्हा पंपावरील मॅनेजर सुरेश मिश्रा आणि इतर कर्मचाऱ्यांनी नम्रता दाखवण्याऐवजी अधिकाऱ्यालाच अरेरावी केली. इतकेच नव्हे तर, ड्युटीवर असलेल्या सरकारी अधिकाऱ्याला घेराव घालून त्यांना धक्काबुक्की करण्यात आली आणि सरकारी कामात अडथळा निर्माण केला.पोलिसांनी केलेल्या चौकशीत पंपावरील कर्मचाऱ्याकडे अवैध रित्या जमा केलेली रोख रक्कम सापडली आहे. धक्कादायक बाब म्हणजे, ही वसुली केवळ कर्मचाऱ्यांपुरती मर्यादित नसून, यात पंपाचे मालक आणि व्यवस्थापनाचेही संगनमत असल्याचे प्राथमिक माहितीवरून समोर येत आहे. दररोज हजारो रिक्षाचालकांकडून अशा प्रकारे 'कमिशन'च्या नावाखाली लाखो रुपयांची लूट केली जात असल्याचे चित्र आहे.पेल्हार पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. मात्र, केवळ गुन्हा दाखल करून हे प्रकरण शमणार नाही. वसई-विरारमध्ये अशा अनेक पंपांवर रिक्षाचालकांना वेठीस धरले जाते.

'जर एका सरकारी अधिकाऱ्यासोबत भरदिवसा अशी वर्तवणूक होत असेल, तर सामान्य रिक्षाचालकाची काय अवस्था होत असेल? अशा गुंड प्रवृत्तीच्या पंप मालकांवर कठोर कारवाई करून त्यांचे परवाने कायमचे रद्द करायला हवेत,' अशी संतप्त भावना स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# 'पेशवेकालीन प्रशासनिक मराठी'चा दरवळ; पालघर ग्रंथोत्सवाचे दिमाखात उद्घाटन

प्रतिनिधी, वसई प्रशासकीय कामाचा डोंगर उपसतानाही साहित्याप्रती असलेली ओढ आणि सखोल संशोधनाची वृत्ती जपणाऱ्या वसई-विरार महापालिकेचे आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी (भा.प्र.से.) यांच्या 'पेशवेकालीन प्रशासनिक मराठी' या ग्रंथाचे प्रकाशन शुक्रवारी पालघर ग्रंथोत्सवाच्या मंचावर दिमाखात संपन्न झाले. सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर असताना, एका सनदी अधिकाऱ्याने प्रशासकीय भाषेत केलेल्या या ऐतिहासिक संशोधनाचे कौतुक सर्वच स्तरांतून होत आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय, जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय आणि मनोहर वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने माणिकपूर येथील समाजउन्नती मंडळाच्या आवारात दोन दिवसीय 'पालघर ग्रंथोत्सव २०२५'चे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याचे उद्घाटन ज्येष्ठ साहित्यिका वीणा गव्हाणकर यांच्या हस्ते ग्रंथदिंडीने करण्यात आले.

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले ते आयुक्त सूर्यवंशी यांच्या पुस्तकाचे प्रकाशन. डिंपल प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या या पुस्तकाविषयी बोलताना सूर्यवंशी भावूक



झाले. 'नोकरीत लागण्यापूर्वी मी हा प्रबंध लिहिला होता. आज प्रशासकीय सेवेतून निवृत्त होताना त्याचे पुस्तकरूपात प्रकाशन होत आहे, याचा सार्थ अभिमान वाटतो. माझ्यापेक्षा माझ्या कुटुंबाला याचा अधिक आनंद आहे,' अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी त्यांच्या पत्नी मीना सूर्यवंशी आणि कन्या रिषिका जिचकार यांची उपस्थिती विशेष लक्षवेधी ठरली.

वीणा गव्हाणकर: 'वाचन म्हणजे केवळ डोळ्यांचा नव्हे, तर मेंदूचा व्यायाम आहे. आयुक्तांनी अशा विषयात संशोधन करून भाषेचा वारसा जपला, हे अभिनंदनीय आहे.'

विवेक पंडित (अध्यक्ष, आदिवासी क्षेत्र आढावा समिती): 'एका प्रशासकीय अधिकाऱ्याने संशोधनात दाखवलेली ही चिकाटी वाखाणण्याजोगी आहे.'

स्नेहाताई दुबे-पंडित (आमदार): 'शहरात वाचन संस्कृती वाढवण्यासाठी अशा ग्रंथांची गरज आहे. पालिकेने पुस्तक विक्री केंद्रांना प्रोत्साहन द्यावे.'

अजीव पाटील (महापौर): 'शहरात फिरते वाचनालय सुरू करण्याचा आमचा मानस आहे. आयुक्तांचे हे पुस्तक भावी पिढीसाठी मार्गदर्शक ठरेल.'

यावेळी ज्येष्ठ रंगकर्मी अशोक समेळ यांनी 'मी अश्वत्थामा चिरंजीव'मधील संवादांनी उपस्थितांची मने जिंकली. या सोहळ्याला उपमहापौर मार्शल लोपीस, विरोधी पक्षनेते मनोज पाटील, माजी महापौर नारायण मानकर, अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे, उपआयुक्त अजित मुठे आणि डिंपल प्रकाशनचे अशोक मुळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा ग्रंथालय अधिकारी प्रशांत पाटील यांनी केले, तर सूत्रसंचालन वीरेंद्र पाटील यांनी आणि आभार प्रदर्शन प्रदीप जाधव यांनी केले.

युवाशक्ती कामगार संघटना (रजि.)
(REGD) YUVASHAKTI KAMGAR SANGHATNA
• कामगारांचे कायदेशीर हक्क, न्याय आणि सन्मान अबाधित राहावेत यासाठी कार्यरत संघटना.
• वेतन, सेवा अटी, कंत्राटी कामगार प्रश्न, अन्यायाविरोधात कायद्याच्या चौकटीत मार्गदर्शन व पाठपुरावा.
अध्यक्ष : रुबिना मुल्ला
कार्याध्यक्ष : तुषार आर. गायकवाड
9890879757 / 9960144348 Email: yuvashaktikamgarsanghatana@gmail.com

बहुजन महा VIEWS & NEWS
RNI NO.MAHMAR/2023/91098
www.bahujanmahaviewsandnews.in
कामगार नेता
हिंदी पाक्षिक

शिवांश न्युज

युवाशक्ती एक्सप्रेस YUVA SHAKTI EXPRESS NEWS
www.yuvashaktiexpress.in

## युवाशक्ती एक्सप्रेस कार्यालय- ९८९०८७९७५७

वृत्तपत्रात प्रसिद्ध होणारा मजकूर आलेल्या कागदपत्रांवर आधारित असतो. त्यामुळे प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत कोणाला आक्षेप असल्यास संबंधितांनी योग्य त्या कागदपत्रांसह **युवाशक्ती एक्सप्रेस** कार्यालयाशी संपर्क साधावा. सदर पुरावे योग्य असल्यास संबंधित बातमी बाबतचा खुलासा प्रसिद्ध केला जाईल. या पत्रात प्रसिद्ध होणा-या मजकुराला मुद्रक स्थळ जबाबदार राहणार नाही.

साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस मते प्रसिद्ध होणा-या कोणत्याही प्रकारच्या जाहिरातींबाबत कुठल्याही प्रकारचा वाद उद्भवल्यास त्याला युवाशक्ती एक्सप्रेस व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वृत्त प्रसिद्धी किंवा अन्य कोणत्याही तत्सम कामासाठी संपादकाशी संपर्क साधायचा असल्यास संबंधितांनी दूरध्वनी कमांक ९८९०८७९७५७ वर संपर्क साधावा.

या नोटीसी द्वारे कळविण्यात येते कि साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणा-या जाहिराती सर्व प्रकारच्या नोटीसी याच्याशी आमचा काहीही संबंध नाही. संबंधित आणि संबंधित व्यक्तीशी परस्पर संबंध साधून त्याबाबत खात्री करावी. साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वर्तमानपत्र व व्यवस्थापन याला कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

संपादक..

Printed,Published And Owned Tushar Rajratna Gaikwad,printed At Vava ArtsB/8 Dronagiri CHS.,Tanki Road Tulinj (E) Tal-Vasai 401209,Published From Room No.10 Kadarbhai Chawl Sarvoday Vasahat Tnki Road Nallasopara (E) Tal--Vasai Dist-Palghar-401209.Editor-tushar Rajratna Gaikwad
RNI NO.MAHMAR/2016/72543. Mobile-9960144348,9890879757,yuvashaktiexpress123@gmail.com www.yuvashaktiexpress.in

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक म्हणून तुषार राजरत्न गायकवाड रु. नं. १०, कादरभाई चाळ, सर्वोदय वसाहत, आंबेडकर नगर, टाकीरोड, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९. ता. वसई, जि. पालघर, येथे प्रकाशित होऊन ९८९०८७९७५७ मे. बाबा आर्टस् बी.०८, मथुरा नगर, द्रोणगिरी अपार्टमेंट, टाकी रोड, साई बाबा मंदिर जवळ, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९ जि. पालघर, महाराष्ट्र येथे मुद्रित करणयात आले. मोबाईल नं. ९९६०१४४३४८
या अंकात प्रसिद्ध झालेलया बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेलया मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद वसई न्यायालयाच्या कक्षेत) Email:yuvashaktiexpress123@gmail.com www.yuvashaktiexpress.in